भारत PPT 3

❖ प्रस्तावना –

- भारतात वैदिक काळाच्या अखेरीस समाजात धार्मिक कर्मकांड वाढीस लागले होते.
- दैनंदिन जीवनात छोटया- छोटया गोष्टींसाठी यज्ञ केले जात असत.
- पशूबळी देण्याची प्रथा रुढ झाली होती.
- याच काळात वर्णव्यवस्थेमुळे समाजात उच्च- नीच असा भेदभाव निर्माण झाला होता.

- भेदभाव हा व्यक्तीच्या योग्यतेवर अवलंबून नव्हता, तर तो व्यक्तींच्या जातींवर अवलंबून होता.
- त्यामुळे समाजात विषमता निर्माण झाली होती.
- या परिस्थितीतून समाजाला योग्य मार्ग दाखवण्याचे काम वर्धमान महावीर व गौतम बुध्द यांनी केले.
- त्यांचा उपदेश सामान्य लोकांना सहज समजणारा व आचरण्यास सोपा होता.

## ❖ धर्म कल्पना –


- आर्य लोक सुरुवातीच्या काळात निसर्गाची पूजा करत असत.
- इंद्र, वरुण, सूर्य, अग्नी या आर्यांच्या प्रमुख देवता होत्या.
- आर्यांनी त्यांना मूर्तीचे स्वरुप दिले नाही.
- नैसर्गिक शक्तींना प्रसन्न करण्यासाठी नैवेदयाची प्रथा रुढ केली.
- नैवेदय अग्नीत अर्पण केला जात असे.
- अग्नीत अर्पण केलेल्या नैवेदयास हवि असे म्हणत.
- अग्नीत हवि अर्पण करण्याची क्रिया म्हणजे यज्ञ होय.

- वैदिक युगाच्या अखेरीस यज्ञविधींचे स्तोम माजले.
- यज्ञविधी करणाऱ्या पुरोहित वर्गाचे प्रस्थ वाढले.
- यज्ञात पशू बळी देण्याची प्रथा वाढली.
- धार्मिक कर्मकांड वाढीस लागले.
- जातिव्यवस्थेमुळे सामाजिक विषमता वाढली.
- या विषमते विरोधात प्रतिक्रिया उमटू लागल्या.
- चार्वाक, कपिल इ. तत्त्ववेत्यांनी बुध्दिप्रामाण्यावर भर देऊन नवीन सामाजिक तत्त्वज्ञानावर आधारित विचारसरणीचा पाया घातला.

❖ जैन धर्म –

➢ वर्धमान महावीर (इ.स. पूर्व ५९९ ते इ.स. पूर्व ५२७ ) –

- जैन शब्दाची उत्पत्ती जिन या शब्दापासून झाली.
- जिन म्हणजे जिंकणारा.
- संपूर्ण इंद्रियांवर विजय मिळविणारा म्हणजे जिन किंवा जैन होय.
- धर्माची तत्त्वे सांगणाऱ्यास जैन धर्मात तीर्थंकर असे म्हणतात.



- ऋषभदेव हे पहिले तीर्थंकर होते.
- जैन धर्मात २४ तीर्थंकर होऊन गेले.
- पार्श्वनाथ हे २३ वे तर वर्धमान महावीर हे २४ वे तीर्थंकर होत.
- अहिंसा हे महावीरांच्या तत्त्वज्ञानाचे सार होते.
- जैन धर्माचे तत्त्वज्ञान व त्यांची शिकवण लोकांना समजण्यासाठी त्यांनी अर्धमागधी या लोक भाषेचा वापर केला.
- "अहिंसा परमो धर्म :" हे जैन धर्माचे ब्रीद वाक्य आहे.

## ➢ जैन धर्माची त्रिरत्ने –

जैन धर्माच्या शिकवणुकीचे सार म्हणजे त्रिरत्ने होत.

१. सम्यक् दर्शन –

महावीरांच्या तत्त्वज्ञानावर श्रध्दा ठेवणे.

२. सम्यक् ज्ञान –

जीवनाविषयीचे तत्त्वज्ञान आत्मसात करुन घेण्यासाठी महावीरांची शिकवण आत्मसात करणे.

३. सम्यक् चारित्र्य –

जैन धर्मांच्या नियमांचे पालन करणे.

जैन धर्मात आचरणाला खुप महत्त्व आहे. कारण तसे झाले नाही तर मानवी जीवनाचे दु:ख वाढते. म्हणून जैन धर्मीय नीतिनियमांच्या पालनास अत्यंत महत्त्व देतात.

- जैन धर्मातील पंचमहाव्रते पुढील प्रमाणे -

१. सत्य –

नेहमी खरे बोलावे व खरेपणाने वागावे.

२. अहिंसा –

कोणत्याही जीवाची हिंसा करु नये.

३. अस्तेय –

चोरी करु नये.

४. अपरिग्रह –

कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेचा साठा करु नये.

५. ब्रह्मचर्य –

आचरण शुध्द ठेवावे.

- महावीरांना जाती भेद मान्य नव्हता.
- व्यक्तीचे मोठेपण हे जातीवर अवलंबून नसते, तर ते उत्तम चारित्र्यावर अवलंबून असते.
- हे त्यांनी लोकांना पटवून दिले.
- पुरुषांप्रमाणे स्त्रियांना ही तपश्चर्या करण्याचा व ज्ञान मिळविण्याचा अधिकार आहे.
- महावीरांच्या मृत्यूनंतर श्वेतांबर व दिगंबर हे दोन संप्रदाय जैन धर्मात उदयास आले.

## ❖ बौध्द धर्म (इ.स. पूर्व ५६३ ते इ.स. पूर्व ४८३ ) –

### ➢ गौतम बुध्द व बौध्द धर्म –

- बौध्द धर्माचे संस्थापक गौतम बुध्द यांचे मूळ नाव सिध्दार्थ होते.
- इ.स. पूर्व ५६३ ला लुंबिनी येथे सिध्दार्थाचा जन्म राजघराण्यात झाला.
- लहानपणीच आईच्या मृत्यूमुळे मावशी गौतमीने त्यांचा सांभाळ केला.
- त्यामुळे ते गौतम म्हणून ओळखले जावू लागले.
- त्यांचा विवाह यशोधरा या राजकन्येशी झाला.
- संसारात त्यांचे मन रमले नाही.

## ➢ महाभिनिष्क्रमण –

- एके दिवशी नगरात फिरत असताना एक वृध्द, एक रोगी, प्रेतयात्रा व एक विरक्त संन्यासी दिसला.
- यावरुन गौतमाच्या लक्षात आले कि, वार्धक्य, व्याधी,मरण व शोक ही जीवनातील अटळ दु:खे आहेत.
- या विचाराने त्यांचे मन अस्वस्थ झाले.
- मानवी आयुष्यातील दु:खाचे मूळ काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी घरादाराचा त्याग केला.
- या घटनेस महाभिनिष्क्रमण असे म्हणतात.

## ➢ गौतमास दिव्य ज्ञानप्राप्ती –

- गौतमाने ज्ञानप्राप्तीसाठी खूप चिंतन केले, तपस्या केली.
- गया येथे निरंजना नदीच्या काठी बोधी (पिंपळ) वृक्षाखाली ध्यानास्थ बसले असता वैशाखी पौर्णिमेला त्यांना दिव्य ज्ञानप्राप्ती झाली.
- त्यामुळे त्यांना बुध्द असे संबोधले जाऊ लागले.



## ➢ गौतम बुध्दांचे धम्मचक्रप्रवर्तन –

- ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर वाराणसीजवळ सारनाथ येथे गौतम बुध्दांनी पहिले प्रवचन दिले.
- त्यांना अनेक शिष्य मिळाले.
- त्यामुळे बौध्द धर्म वाढीस लागला.
- दु:खमय जीवनातून निर्वाणाकडे नेण्यासाठी त्यांनी धम्मचक्रप्रवर्तन सुरु केले.
- वयाच्या ८० व्या वर्षी कुशीनगर येथे इ.स. पूर्व ४८३ मध्ये भगवान गौतम बुध्दांचे महापरिनिर्वाण झाले.

## ➢ बौध्द धर्माची शिकवण –

- गौतम बुध्दांनी पाली या लोकभाषेतून साध्या आणि सोप्या पध्दतीने बौध्द धर्माची शिकवण व आचार – विचार सांगितले.
- हि माहिती विनयपिटक, अधिधम्मपिटक व सुत्तपिटक या त्रिपीटक ग्रंथात दिली आहे.
- गौतम बुध्दांनी धर्माची शिकवण व आचरण यासाठी चार आर्यसत्ये, अष्टांग मार्ग व पंचशील सांगितले आहे.

## ➢ चार आर्यसत्ये –

मानवी जीवन दु:खमय आहे. दु:खाची निर्मिती वासनेतून होते, म्हणून वासनेवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

१. दु:ख –

मानवी जीवन हे दु:खमय आहे.

२. तृष्णा –

दु:खाचे मुळ कारण आहे.

३. दु:खाचे निराकरण –

दु:खाचा अंत करता येतो.

४. प्रतिपद –

दु:ख निवारण्याचा मार्ग

ही चार आर्यसत्ये सांगितली आहे.

➢ **अष्टांग मार्ग** –

गौतम बुध्दांनी दु:ख निवारण्यासाठी जो मार्ग सांगितला त्याला  अष्टांग मार्ग असे म्हणतात.

१. **सम्यक् दृष्टी** –

मानवाने जीवनाकडे योग्य दृष्टीने पाहिले पाहिजे.

२. **सम्यक् विचार** –

सत्ता, संपत्ती , राग, लोभ यांचा त्याग केला पाहिजे.

३. **सम्यक् भाषण** –

आपले बोलणे सत्य असावे, कोणाचीही निंदा करु नये.

४. **सम्यक् कृती** –

फळाची अपेक्षा न करता कर्म करावे.

५. **सम्यक् उपजीविका** –

उदरनिर्वाहासाठी नीतिनियमाने संपत्ती मिळवावी.

६. सम्यक् व्यायाम –

इंद्रियांवर संयम ठेवणे, मनातील दुष्ट विचारांचा त्याग व सदविचारांचा स्वीकार करणे.

७. सम्यक् स्मृती –

इंद्रियांवर ताबा ठेवून आत्मसंयमाने राहून चांगल्या स्मृती जपणे.

८. सम्यक् समाधी –

योग्य चिंतन करुन ध्यानस्थ व्हावे म्हणजे निर्वाणपदाला जाता येते.

गौतम बुध्दांच्या अष्टांग मार्गाचे सार म्हणजे शील, समाधी व प्रज्ञा होय.

अष्टांग मार्गाच्या आचरणासाठी बुध्दांनी पाच नियम सांगितले आहे. ती पुढील प्रमाणे –

१. अहिंसा –

हिंसा करु नये.

२. सत्य –

खोटे बोलू नये.

३. अस्तेय –

चोरी करु नये.

४. इंद्रिय संयम –

वासनेवर नियंत्रण ठेवावे.

५. मादक पदार्थांचे सेवन करु नये.

- गौतम बुध्दांनी बुध्दिप्रामाण्यवादाचा (जे स्वत:च्या बुध्दिला पटेल व सामाजिक हिताचे असेल) पुरस्कार केला.
- सामाजिक विषमता व कर्मकांडाला विरोध केला.
- आपले विचार लोकांपर्यंत पोचवण्यासाठी बौध्द संघ स्थापन केला.
- जे बौध्द संघात प्रवेश करत त्यांना भिक्खू म्हणत.
- त्यांना आचरणाचे कडक नियम पाळावे लागत.
- लोकांना उपदेश करण्यासाठी वर्धमान महावीर व गौतम बौध्द स्व:ता खेडोपाडी फिरले.
- समाजाला कर्मकांडातून मुक्त होण्याचा मार्ग सांगितला.

# Assessment

- योग्य जोडया लावा.

| अ गट | ब गट |
| --- | --- |
| १. जैन धर्म | १. कुंदग्राम |
| २. वर्धमान महावीर | २. लुंबिनी |
| ३. भगवान बुध्द | ३.जिन |
| ४. अस्तेय | ४. हत्या न करणे. |
| | ५. चोरी न करणे. |

1- 3, 2- 1, 3- 2, 4- 5

# Exercises

- वर्धमान महावीर व गौतम बुध्द यांची चरित्रे वाचून त्यातील शिकवण आजच्या काळात योग्य आहे का? तुमची मते लिहा.
- प्रचलित असणाऱ्या रुढी व कर्मकांड या संदर्भात घरच्यांशी चर्चा करा.
- महात्मा फुले यांच्या सामाजिक सुधारणा कार्याची शिक्षकांकडून माहिती घ्या.
- पाली लिपीची माहिती घ्या.
- भगवान महावीर व भगवान गौतम बुध्द यांच्याशी संबंधीत असणाऱ्या एखाद्या ऐतिहासिक स्थळी शाळेची सहल शिक्षकांच्या मदतीने आयोजित करा.